RNI No. MAHBIL /2009/35530

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ४५(२)] गुरुवार, सप्टेंबर ७, २०१७/भाद्र १६, शके १९३९ [पृष्ठे ११, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ८८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

	पृष्ठे
सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम	१—११

दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

नि. ज. जमादार,
प्रधान सचिव व विधि परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ७ सप्टेंबर २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता

१९६१ चा महा. २४. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ यामध्ये प्रकरण अकरा-१अ समाविष्ट करणे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या प्रकरण अकरानंतर पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :— १९६१ चा महा. २४.

" प्रकरण अकरा-१अ

बिगर कृषि सहकारी पत संस्था.

बिगर कृषि सहकारी पत संस्थांना प्रकरण अकरा-१अ लागू होणे.

१४४-२अ. (१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर हे प्रकरण बिगर कृषि सहकारी पत संस्था यांना लागू होईल.

(२) या प्रकरणाच्या तरतुदी ह्या यात यापुढे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा, या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींव्यतिरिक्त असतील आणि त्या, त्यांना न्यूनीकारक ठरणाऱ्या नसतील.

व्याख्या.

१४४-३अ. या प्रकरणात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " बिगर कृषि सहकारी पत संस्था " याचा अर्थ, ज्या संस्थेचे मुख्य उद्दिष्ट तिच्या सदस्यांना कर्ज देणे आणि सदस्याकडून ठेवी स्वीकारणे हे असेल अशी संस्था, असा आहे आणि त्यामध्ये पुढील संस्थांचा समावेश होतो :—

(एक) नागरी सहकारी पत संस्था ;

(दोन) ग्रामीण बिगर कृषि सहकारी पत संस्था ;

(तीन) पगारदार कर्मचारी सहकारी पत संस्था ;

(चार) राज्य शासन, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, याबाबत वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी इतर कोणतीही संस्था किंवा संस्थांचा वर्ग ;

(ब) " महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पत संस्था नियामक मंडळ " किंवा " नियामक मंडळ " याचा अर्थ, कलम १४४-१३अ अन्वये घटित केलेले मंडळ, असा आहे ;

(क) " स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी " याचा अर्थ, कलम १४४-२५अ अन्वये घटित करण्यात आलेला स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी, असा आहे.

बिगर कृषि सहकारी पत संस्थेस ज्यामध्ये कामकाज करता येईल अशा कामकाजाचे प्रकार.

१४४-४अ. (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१७ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश " उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ " असा करण्यात आला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून बिगर कृषि सहकारी पत संस्थेस पुढीलपैकी एक किंवा अनेक प्रकारांचे कामकाज करता येईल :— २०१७ चा महा. ५७.

(अ) पैसा कर्जाऊ घेणे, सदस्यांकडून ठेवी उभारणे किंवा स्वीकारणे, एकतर प्रतिभूतिवर किंवा प्रतिभूतिशिवाय रक्कम उसनी देणे किंवा आगाऊ देणे, कर्जांची व आगाऊ रकमांची तडजोड करणे, सदस्यांना स्वतःहून सुरक्षित ठेवघरे पुरविणे ;

(ब) त्यांच्या कोणत्याही दाव्यांच्या पूर्तीमुळे किंवा अंशतः पूर्तीमुळे अशा बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या ताब्यात येत असलेल्या कोणत्याही मालमत्तेचे व्यवस्थापन करणे, तिची विक्री करणे व ती संपादित करणे ;

(क) कोणत्याही कर्जाबद्दलच्या किंवा अग्रिमाबद्दलच्या प्रतिभूती किंवा अंशतः प्रतिभूती असलेली किंवा अशा कोणत्याही प्रतिभूतीशी संबंधित असेल अशी कोणतीही मालमत्ता किंवा अशा कोणत्याही मालमत्तेमधील कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध संपादित करणे, धारण करणे आणि यासंबंधात सर्वसाधारणपणे त्यांच्याशी संबंधित व्यवहार करणे ;

(ड) बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा सोईस्कर असेल अशी कोणतीही इमारत किंवा बांधकामे संपादित करणे, बांधकाम करणे, त्यांचे परिरक्षण करणे व त्यांमध्ये फेरफार करणे ;

(ई) बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या मालमत्तेचा व हक्कांचा सर्व किंवा कोणताही भाग याची विक्री, सुधारणा, व्यवस्थापन, विकास, विनिमय करणे, भाडेपट्ट्याने देणे, गहाण ठेवणे, विल्हेवाट लावणे किंवा त्यांचे खात्यात रूपांतर करणे अथवा अन्यथा त्यांच्याशी संबंधित व्यवहार करणे ;

(फ) बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या कोणत्याही सदस्याला दिलेल्या कर्जाच्या वसुलीच्या प्रयोजनासाठी, जर अशा सदस्याचा व्यवसाय या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा असेल तेव्हा, अशा संपूर्ण व्यवसायाचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे संपादन करणे किंवा त्याचे कार्य हाती घेणे ;

(ग) बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या कामकाजाचे प्रचालन किंवा अभिवृद्धी यासाठी आनुषंगिक किंवा हितावह असतील अशा अन्य सर्व गोष्टी करणे ;

(ह) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार, निबंधकाच्या पूर्वमंजुरीने मत्तेचे पुनर्रचना करण्याचे कार्य स्वतः हाती घेणे किंवा त्याकरता सहाय्य घेणे ;

(आय) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असे, बिगर कृषि सहकारी पत संस्थेने ज्या प्रकारचे कामकाज करणे विधिसंमत असेल असे अन्य कोणतेही कामकाज.

(२) उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी कोणत्याही बिगर कृषि सहकारी पतसंस्थेने पोट-कलम (१) अन्वये निर्देशिलेल्या कामकाजाव्यतिरिक्त इतर कोणतेही कामकाज आधीच हाती घेतले असेल तर, त्याबाबतीत अशी संस्था, उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत असे कामकाज पूर्ण करील :

परंतु, जर विशिष्ट प्रकरणांत, बिगर कृषि सहकारी पत संस्थेचा कोणताही विस्तार तिच्या हिताचा असल्याबाबत निबंधकाची खात्री पटली असेल तर, त्यास, हा कालावधी, त्याला योग्य वाटतील अशा अटी व शर्तींना अधीन राहून आणि बारा महिन्यापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी वाढविता येईल, जेणेकरून एकूण कालावधी हा तीस महिन्यापेक्षा अधिक होणार नाही.

सदस्य नसलेल्या व्यक्तींकडून ठेवी स्वीकारण्यास प्रतिबंध असणे.

१४४-५अ. कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही बिगर कृषि सहकारी पत संस्था, तिचा सदस्य नसेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून ठेव स्वीकारणार नाही. उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, जर कोणत्याही संस्थेने तिचा सदस्य नसलेल्या व्यक्तींकडून ठेवी स्वीकारल्या असतील तर, ती उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ च्या प्रारंभापासून दोन वर्षाच्या आत, एकतर त्यांची सदस्य म्हणून नोंदणी करील किंवा सदस्य नसलेल्या सर्व व्यक्तींच्या ठेवी परत करील.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, “ सदस्य ” यामध्ये नाममात्र सदस्य अंतर्भूत नाही.

व्यापारास प्रतिबंध.

१४४-६अ. कलम १४४-४अ किंवा कोणत्याही संविदेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही बिगर कृषि सहकारी पत संस्था, तिला दिलेल्या प्रतिभूतीच्या संपादनाच्या संबंधात किंवा तिने धारण केली असेल किंवा ती कोणत्याही व्यापारात गुंतलेली असेल किंवा इतरांसाठी मालाची खरेदी, विक्री किंवा मालविनिमय करीत असेल ते खेरीजकरून मालाची खरेदी किंवा विक्री किंवा मालविनिमय यामध्ये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे व्यवहार करणार नाही.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, “ माल ” याचा अर्थ, कारवाई योग्य दावे, रोखे, पैसा, सोनेचांदी व मौल्यवान ऐवज यांव्यतिरिक्त असलेली कोणत्याही प्रकारची जंगम मालमत्ता आणि कलम १४४-४अ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेले सर्व संलेख, असा आहे.

बिगर कृषि सहकारी पत संस्थेस आवश्यक नसेल अशी मालमत्तेची विल्हेवाट लावणे.

१४४-७अ. कलम १४४-४अ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही बिगर कृषि सहकारी पत संस्था, जी तिच्या स्वतःच्या वापरासाठी आवश्यक नसेल, अशी कोणत्याही प्रकारे संपादित केलेली कोणतीही स्थावर मालमत्ता ती संपादित केल्यापासून किंवा उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ च्या प्रारंभाच्या दिनांकापासून, यापैकी, जो नंतरचा असेल तेव्हापासून सात वर्षांपेक्षा अधिक असलेल्या कोणत्याही कालावधीसाठी किंवा या कलमाखालील अशा कोणत्याही वाढीव कालावधीसाठी धारण करणार नाही, आणि अशा मालमत्तेची, अशा कालावधीच्या आत किंवा, यथास्थिति, वाढीव कालावधीच्या आत विल्हेवाट लावील :

परंतु, बिगर कृषि सहकारी पत संस्थेस, उपरोक्त सात वर्षांच्या कालावधीच्या आत अशा कोणत्याही मालमत्तेची विल्हेवाट लावणे सुकर व्हावे याकरिता तिचा व्यवहार करता येईल :

परंतु आणखी असे की, निबंधकास, कोणत्याही विशेष प्रकरणात जर त्याची खात्री पटली की अशी मुदतवाढ ही बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या हिताची असेल तर त्यास योग्य वाटतील अशा अटी व शर्तींना अधीन राहून, उपरोक्त सात वर्षांचा कालावधी आणखी तीन वर्षांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीसाठी वाढविता येईल.

प्रशासनिक आणि आस्थापना खर्च यांवरील मर्यादा.

१४४-८अ. बिगर कृषि सहकारी पत संस्था, नियामक मंडळाने अधिसूचित केल्याप्रमाणे, प्रशासनिक आणि आस्थापना खर्चावरील मर्यादा ओलांडणार नाही.

संस्थेने रोख राखीव निधी ठेवणे.

१४४-९अ. बिगर कृषि सहकारी पत संस्था, नियामक मंडळ वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, तिच्या एकूण ठेवींच्या पाच टक्क्यांहून अधिक नसेल अशा टक्केवारी एवढी रक्कम, स्वतःकडे रोखीच्या स्वरूपात, किंवा एखाद्या बँकेमधील किंवा बँकांमधील तिच्या चालू खात्यातील किंवा बचत खात्यातील सरासरी शिलकीच्या स्वरूपात किंवा पंधरा दिवसांहून अधिक नसेल इतक्या दिवसांच्या मुदत ठेवीच्या स्वरूपात ठेवील आणि अशाप्रकारे एकूण आणि प्रत्येक शाखेत ठेवलेली अशी रक्कम दर्शविणारे त्याबाबतचे विवरण, प्रत्येक तिमाहीच्या अखेरच्या पंधराव्या दिवशी किंवा त्यापूर्वी, निबंधकाला सादर करील :

परंतु, धारण केलेल्या निर्धारित तरलता निधीतून, कलम १४४-१०अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात, काढलेल्या अधिकर्षास, या कलमाच्या प्रयोजनार्थ रोख राखीव निधी म्हणून समजण्यात येईल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ " बँक " या संज्ञेचा अर्थ, कलम ७० मध्ये नमूद केलेली बँक, असा आहे.

संस्थेने निर्धारित तरलता निधीचे प्रमाण राखणे.

१४४-१०अ. बिगर कृषि सहकारी पत संस्था, नियामक मंडळ वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे तिच्या एकूण ठेवींच्या पंचवीस टक्क्यांपेक्षा कमी नसेल अशा टक्केवारीच्या किंवा चाळीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशा टक्केवारीच्या रकमेएवढी, एखाद्या बँकेतील मुदती ठेवींमधील सरासरी शिलकीच्या स्वरूपात निर्धारित तरलता निधी धारण करील आणि अशा प्रकारे धारण केलेली रक्कम दर्शविणारे विवरण, प्रत्येक तिमाहीच्या अखेरच्या पंधराव्या दिवशी किंवा त्यापूर्वी ते निबंधकाला सादर करील.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ " बँक " या संज्ञेचा अर्थ, कमल ७० मध्ये नमूद केलेली बँक, असा आहे.

कर्जे व अग्रिम देण्यावरील निर्बंध.

१४४-११अ. (१) बिगर कृषि सहकारी पत संस्था,—

(अ) कलम ४४ प्रमाणे तिच्या स्वतःच्या समभागांच्या प्रतिभूतीवर कोणतीही कर्जे व अग्रिम रकमा मंजूर करणार नाही ;

(ब) (एक) तिच्या विद्यमान कोणत्याही संचालकाच्या स्वतःच्या नियत ठेवींवर किंवा जेथे तो संचालक असेल त्या संस्थेत त्याच्या कुटुंबातील सदस्याच्या नावे असलेल्या ठेवींवर किंवा त्याने दिलेल्या पुरेशा व निर्विवाद प्रतिभूतीवर असेल ते खेरीज करून अन्यथा, तिच्या अशा कोणत्याही संचालकाला किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याला किंवा त्याच्या वतीने ;

(दोन) ज्या व्यवसाय संस्थेमध्ये किंवा कंपनीमध्ये कोणत्याही संचालकाचा किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याचा मालक, भागीदार, व्यवस्थापक, हमीदार किंवा मुख्य भागधारक म्हणून हितसंबंध असेल किंवा ज्यामध्ये त्याने कोणताही हितसंबंध धारण केला असेल अशा कोणत्याही व्यवसाय संस्थेला किंवा कंपनीला किंवा तिच्या वतीने,

कोणतेही कर्ज किंवा अग्रिम मंजूर करण्याची कोणतीही हमी देणार नाही.

(२) एखाद्या बिगर कृषि सहकारी पत संस्थेने मंजूर आणि संवितरित केलेले कर्ज किंवा अग्रिम हे असे असेल की, उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभापूर्वी ज्या दिनांकास ते कर्ज किंवा अग्रिम मंजूर आणि संवितरित केले होते त्या दिनांकास, जर पोट-कलम (१) चा खंड (ब) अंमलात राहिला असता तर, ते कर्ज किंवा अग्रिम मंजूर आणि संवितरित करता आले नसते, त्याबाबतीत, ते कर्ज किंवा अग्रिम मंजूर करण्याच्या वेळी निर्धारित केलेल्या कालावधीत, किंवा जेथे असा कोणताही कालावधी निर्धारित करण्यात आलेला नसेल तेथे, त्या कर्जावर किंवा अग्रिमावर देय असलेल्या कोणत्याही व्याजासह ते कर्ज किंवा अग्रिम यापोटी त्या बिगर कृषि सहकारी पत संस्थेला देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ च्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षे समाप्त होण्यापूर्वी, उपाययोजना करण्यात येईल.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखादा व्यवहार हा, कोणतेही कर्ज अथवा अग्रिम आहे किंवा कसे याबाबत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, तो प्रश्न निर्णयार्थ निबंधकाकडे पाठविण्यात येईल, त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

स्पष्टीकरण.— या कलमाच्या प्रयोजनार्थ, " कुटुंब " या संज्ञेचा अर्थ, कलम ७५ च्या पोट-कलम (२) च्या स्पष्टीकरणात नमूद केल्याप्रमाणे असेल.

कर्ज माफ करण्याच्या अधिकारावरील निर्बंध.

१४४-१२अ. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही बिगर कृषि सहकारी पत संस्था,—

(अ) तिच्या कोणत्याही माजी आणि विद्यमान संचालकाकडून आणि त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याकडून ; किंवा

(ब) ज्या कोणत्याही व्यवसाय संस्थेमध्ये किंवा कंपनीमध्ये संचालक, भागीदार, व्यवस्थापकीय अभिकर्ता किंवा हमीदार किंवा मुख्य भागधारक या नात्याने तिच्या कोणत्याही माजी आणि विद्यमान संचालकाचा किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्याचा हितसंबंध गुंतलेला असेल किंवा ज्यामध्ये त्याने कोणताही हितसंबंध धारण केलेला असेल अशा कोणत्याही व्यवसाय संस्थेकडून किंवा कंपनीकडून,

तिला देय असलेल्या कोणत्याही कर्जाची संपूर्ण रक्कम किंवा त्याच्या भागाची रक्कम, निबंधकाची पूर्व मान्यता आणि नियामक मंडळाचा सल्ला घेतला असल्याखेरीज, माफ करणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून देण्यात आलेली कोणतीही सूट ही रद्दबातल आणि परिणाम शून्य असेल.

स्पष्टीकरण.— या कलमाच्या प्रयोजनार्थ, " कुटुंब " या संज्ञेचा अर्थ, कलम ७५ च्या पोट-कलम (२) च्या स्पष्टीकरणात नमूद केल्याप्रमाणे असेल.

महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ.

१४४-१३अ.— राज्य शासन, उक्त सुधारणा अधिनियम, २०१७ याच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाखाली किंवा याअन्वये नेमून देण्यात येतील, अशी कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी, महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पत संस्था नियामक मंडळ घटित करील.

नियामक मंडळाची रचना.

१४४-१४अ.— नियामक मंडळ पुढील सदस्यांनी मिळून बनलेले असेल :—

(अ) निबंधक, जो नियामक मंडळाचा अध्यक्ष असेल ;

(ब) निबंधकाने नियुक्त केलेला, अपर निबंधकाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसेल असा एक अधिकारी ;

(क) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे, कोणत्याही सहकारी बँकेमधील उप महा व्यवस्थापकाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचे नसतील असे दोन सेवानिवृत्त अधिकारी,—

(एक) अशा अधिकाऱ्यांनी कोणत्याही बँकेच्या उप महा व्यवस्थापकाच्या दर्जापेक्षा खालचा दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याच्या पदावरील किमान दहा वर्षांचा अनुभव धारण केलेला असावा आणि त्यांच्या विरुद्ध इतर कोणतीही शिस्तभंगाची किंवा इतर कोणतीही कायदेशीर कारवाई करण्यात आलेली नसावी ; आणि

(दोन) त्यांच्यापैकी एक अधिकारी हा, जिचे संपूर्ण राज्यात कार्यक्षेत्र असेल अशा बँकेच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेला असावा आणि दुसरा अधिकारी हा, जिचे राज्यापेक्षा कमी कार्यक्षेत्र असेल अशा बँकेच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेला असावा ;

(ड) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा, निबंधकाने ठेवलेल्या लेखा परीक्षकांच्या नामिकेवर ज्याचे नाव असेल आणि ज्याला बिगर कृषि सहकारी पत संस्थांच्या लेखापरीक्षणाचा किमान १० वर्षांचा अनुभव असेल असा, एक सनदी लेखापाल ;

(ई) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे, ज्यांना मागील सलग तीन वर्षांमध्ये "अ" लेखापरीक्षा वर्ग देण्यात आला असेल अशा बिगर कृषि सहकारी पत संस्थांचे चार प्रतिनिधी,—

(एक) त्यांना बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या संचालकाच्या पदावरील किमान दहा वर्षांचा अनुभव असावा आणि ते, कलम ७३ कअ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही समितीचे सदस्य होण्यास किंवा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास किंवा नामनिर्देशित किंवा स्वीकृत केले जाण्यास किंवा निवड केली जाण्यास अपात्र नसावेत, आणि

(दोन) त्यांच्यापैकी एक हा, जिचे संपूर्ण राज्यात कार्यक्षेत्र असेल अशा संस्थेचा संचालक असावा ; आणि त्यांच्यापैकी एक हा जिचे एखाद्या जिल्ह्यापेक्षा कमी नसेल इतक्या क्षेत्रावर कार्यक्षेत्र असेल अशा संस्थेचा संचालक असावा ; आणि त्यांच्यापैकी दोघे हे, जिचे जिल्ह्यापेक्षा कमी असेल इतक्या क्षेत्रावर कार्यक्षेत्र असेल अशा संस्थेचे संचालक असावेत.

नियामक मंडळाचा सचिव.

१४४-१५अ.— उप निबंधकापेक्षा खालच्या दर्जाचा नसेल अशा एखाद्या अधिकाऱ्याची, नियामक मंडळाचा सचिव म्हणून निबंधकाकडून नियुक्ती करण्यात येईल.

नियामक मंडळाच्या अशासकीय सदस्यांचा पदावधी.

१४४-१६अ.— राज्य शासनाच्या मर्जीच्या अधीनतेने, नियामक मंडळाच्या अशासकीय सदस्यांचा पदावधी, नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षे इतका असेल. नियामक मंडळाच्या अशासकीय सदस्याला केवळ एकदाच पुन्हा नामनिर्देशित करता येईल.

अशासकीय सदस्यांचा राजीनामा.

१४४-१७अ.— अशासकीय सदस्यास, नियामक मंडळाच्या अध्यक्षाला संबोधून कोणत्याही वेळी, आपल्या पदाचा लेखा राजीनामा देता येईल. नियामक मंडळाच्या सदस्याचा राजीनामा, अध्यक्षाला तो प्राप्त झाल्यावर, लगेच अंमलात येईल.

अशासकीय सदस्यास पदावरून दूर करणे.

१४४-१८अ.— राज्य शासनास, कोणत्याही अशासकीय सदस्याला त्याच्या पदावरून दूर करता येईल, जर तो,—

(अ) नादार असेल ; किंवा

(ब) शासनाच्या मते ज्यात नैतिक अध:पताचा अंतर्भाव आहे अशा कोणत्याही अपराधाबद्दल तो दोषी ठरलेला असेल किंवा त्याला कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली असेल ; किंवा

(क) तो विकल मनाचा झालेला असेल आणि सक्षम प्राधिकाऱ्याने त्याला तसे घोषित केलेले असेल ; किंवा

(ड) सदस्य म्हणून कार्य करण्यास त्याने नकार दिला असेल किंवा सदस्य म्हणून कार्य करण्यास तो असमर्थ ठरला असेल ; किंवा

(ई) कलम ७३ कअ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणत्याही संस्थेच्या समितीचा सदस्य होण्यास किंवा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास किंवा नामनिर्देशित किंवा स्वीकृत केला जाण्यास किंवा सदस्य म्हणून निवड केली जाण्यास अपात्र ठरला असेल.

नैमित्तिक रिक्त जागा कशा भराव्यात.

१४४-१९अ.— नियामक मंडळातील नैमित्तिक रिक्त जागा जसजशा रिक्त होतील तसतशा त्या, कलम १४४-१४अ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने भरण्यात येतील.

नियामक मंडळाचे कामकाज चालवण्याची रीत.

१४४-२०अ.— नियामक मंडळाची बैठक, बैठकीची गणपूर्ती आणि नियामक मंडळाच्या कामकाज चालविण्यासंबंधीची रीत विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

नियामक मंडळाच्या अशासकीय सदस्यांचे भत्ते.

१४४-२१अ.— राज्य शासन, **राजपत्रात,** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असे भत्ते नियामक मंडळाच्या अशासकीय सदस्यांना स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीतून देण्यात येतील.

नियामक मंडळाची कार्ये व अधिकार.

१४४-२२अ.— (१) नियामक मंडळाला, या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहुन, पुढील बाबतीत विनियम करण्याचा अधिकार असेल :—

(अ) सहकारी संस्थेद्वारे एका सदस्यांकडून जमा करून घेता येईल अशी कमाल ठेव रक्कम ;

(ब) ठेवी आणि प्रतिभूत व अप्रतिभूत कर्जावरील व्याजाचा कमाल व किमान दर ;

(क) एका सदस्याला जेवढे कर्ज देता येईल त्या कर्जाची अधिकतम मर्यादा आणि त्याचे सर्व संबंधित लेखे ;

(ड) रोखदायित्व निधीमार्फत बिगर कृषि सहकारी पत संस्थेकडून पाळावयाची कमाल मर्यादा ;

(ई) बिगर कृषि सहकारी पत संस्थेकडून स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीत योगदान करावयाच्या अंशदानाचा दर आणि त्याची नियतकालिकता, जी वार्षिक किंवा अन्यथा असेल ;

(च) सहकारी संस्थेकरिता स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीतून ठेवीच्या परताव्यासाठी सहाय्य मिळावे म्हणून पात्र ठरण्यासाठीचे निकष ;

(छ) बिगर कृषि सहकारी पत संस्थेने परवानगीने प्रशासकीय व आस्थापना वरती करावयाच्या खर्चाची कमाल मर्यादा.

(२) नियामक मंडळाला पुढील बाबतीत, मार्गदर्शकतत्त्वे घालून देण्याचा अधिकार असेल :—

(अ) अनुत्पादक मत्तेचे वर्गीकरण ;

(ब) सहकारी संस्थेचा मुख्य कार्यकारी अधिकारी व अन्य अधिकारी आणि कर्मचारी म्हणून नियुक्ती करावयासाठी पात्र ठरण्याकरिता किमान शैक्षणिक पात्रता व प्रशिक्षण ;

(क) ज्या सहकारी संस्थेला स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीत अंशदान करता येईल त्या सहकारी संस्थेसाठी पात्रतेचे निकष ;

(ड) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार मत्ता पुनर्रचना कंपनी म्हणून किंवा अन्यथा कार्य करण्यासाठी एक किंवा अधिक कंपन्या किंवा सहकारी संस्था, यांना मान्यता ;

(ई) बिगर कृषि सहकारी पत संस्थांच्या हितासाठी नियामक मंडळाला वेळोवेळी काढणे योग्य व आवश्यक वाटेल अशा बाबींवरील सर्वसाधारण मार्गदर्शकतत्त्वे.

(३) राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यास वेळोवेळी योग्य वाटेल अशी अन्य कार्ये व अधिकार, नियामक मंडळास प्रदान करता येतील.

बिगर कृषि सहकारी पत संस्थेवर विनियम व मार्गदर्शक तत्त्वे बंधनकारक असणे.

१४४-२३अ.— (१) बिगर कृषि सहकारी पत संस्थेस, नियामक मंडळाने कलम १४४-२२अ अनुसार केलेले विनियम व घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे यांचे अनुपालन करणे बंधनकारक असेल.

(२) निबंधकाला, नियामक मंडळाने वेळोवेळी तयार केलेले विनियम व घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे यांचे अनुपालन व्हावे म्हणून, सहकारी संस्थेकडून अहवाल मागविता येईल.

बिगर कृषि पत संस्थेस अधिस्थगन किंवा निदेश देणे.

१४४-२४अ.— (१) निबंधकास, ठेवीदारांच्या आणि किंवा सदस्यांच्या हितास हानी पोहचेल अशा रीतीने किंवा बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या हिताला बाधा पोहचेल अशा रीतीने चालविण्यात येत असलेल्या कोणत्याही बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या कामकाजास प्रतिबंध करण्यासाठी किंवा समुचित व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी कोणत्याही बिगर कृषि सहकारी पत संस्थे बाबतीत, जर त्याची तसे करण्याबाबत खात्री पटली असेल तर, सदर बिगर कृषि सहकारी पत संस्थेस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर अधिस्थगन देण्याचा आणि किंवा निदेश देण्याचा अधिकार असेल.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, निबंधकाला :—

(अ) विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापर्यंत ठेवीची रक्कम परत करण्यासाठी किंवा ती काढून घेण्यासाठी कोणत्याही बिगर कृषि सहकारी पत संस्थेवर निर्बंध लादता येतील ;

(ब) सांविधिक तरलता प्रमाण व रोख दायित्व निधी प्रमाण यांच्याशी संबंधित विवक्षित शर्तीचे किंवा कोणत्याही अन्य शर्तीचे अनुपालन करण्यात येईतोपर्यंत सहकारी संस्था, कोणात्याही जास्तीच्या किंवा आणखी ठेवी स्वीकारणार नसेल, तेव्हा आदेश काढता येतील ; किंवा

(क) पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेला कोणताही अधिस्थगन किंवा दिलेला निदेश यात फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल, आणि अशा रितीने फेरबदल केलेला किंवा रद्द केलेला कोणताही अधिस्थगन किंवा निदेश यासाठी ज्या शर्तीच्या अधीन राहून फेरबदल केल्याचे किंवा रद्द केल्याचे अंमलात येईल अशा त्याला योग्य वाटतील त्या, शर्ती लादता येतील.

स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी घटित करणे.

१४४-२५अ. राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, " स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी " निर्माण करील आणि त्यामध्ये बिगर कृषि सहकारी पत संस्थेने केलेले अंशदान, सहाय्याच्या रकमेचा परतावा व त्यावरील व्याज, कर्जे, प्राप्त देणग्या आणि शासनाकडून प्राप्त झालेले कोणतेही सहाय्य, यांचा समावेश असेल.

सहकारी पत संस्थेने निधीत अंशदान करणे.

१४४-२६अ. (१) प्रत्येक बिगर कृषि सहकारी पत संस्था, नियामक मंडळाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी अधिसूचित केले असेल त्याप्रमाणे अशा दराने व अशारितीने स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीत वार्षिक किंवा अन्यथा अंशदान करील.

(२) एकदा केलेल्या अंशादानाचा कोणताही भाग, कोणत्याही कारणासाठी, कोणत्याही बिगर कृषि सहकारी पतसंस्थेला परत केला जाणार नाही.

निधीचा वापर.

१४४-२७अ. (१) नियामक मंडळाकडून वेळोवेळी निर्धारित करण्यात येतील अशा अटी व शर्तीनुसार कलम १४४-१०अ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सांविधिक तरलता प्रमाण राखण्यासाठी पात्र असलेल्या बिगर कृषि सहकारी पत संस्थेला तरलता सहाय्य पुरविण्याकरिता " स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी " वापरण्यात येईल.

(२) या कलमाच्या पोट-कलम (३) खाली अधिसूचित केल्याप्रमाणे, समझोत्याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर जी परिसमापनासाठी विचारात घेण्यात आली असेल, अशा बिगर कृषि सहकारी पतसंस्थेच्या सदस्यांच्या बाबतीत, दाव्याची रक्कम चुकती करण्यासाठी देखील स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी वापरता येईल. प्रत्येक ठेवीदारास सदस्याची हिशेबपूर्तीची रक्कम ही, ठेवीदाराच्या ठेवीची प्रत्यक्ष रक्कम, किंवा राज्य शासनाकडून **राजपत्रात,** वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल अशी रक्कम, यापैकी जी कमी असेल ती असेल.

(३) या कलमाच्या पोट-कलम (२) च्या प्रयोजनांसाठी राज्य शासन, **राजपत्रात** हिशेबपूर्तीस प्रारंभ केल्याचा दिनांक अधिसूचित करील.

निधीची देखरेख, उपयोगात आणणे आणि गुंतवणे.

१४४-२८अ. (१) नियामक मंडळाद्वारे स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीचे व्यवस्थापन करण्यात येईल व उपयोगात आणण्यात येईल.

(२) स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीत जमा करण्यात आलेली रक्कम नियामक मंडळाच्या नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत, किंवा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत किंवा मागील तीन वर्षात " अ " लेखापरीक्षा वर्ग असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत किंवा दोनशे कोटी अथवा त्याहून अधिक निव्वळ मत्ता असलेल्या कोणत्याही बँकेत उघडण्यात आलेल्या खात्यात ठेव म्हणून ठेवण्यात येईल.

(३) स्थिरीकरण आणि तरलता सहाय्य निधीत जमा करण्यात आलेली रक्कम उपरोक्त कोणत्याही बँकेत गुंतवण्यात येईल, अशा कोणत्याही बँकेत गुंतवण्यात आलेली रक्कम ही, अशी गुंतवणूक करण्याच्या वेळेस उक्त निधीच्या एकूण मुद्दलाच्या वीस टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही.

(४) या कलमाच्या प्रयोजनांसाठी नियामक मंडळाकडे पुढील अधिकार असतील :—

(अ) आदेशात नमूद केले असेल त्याप्रमाणे व्याजाच्या दरात, परतफेडीच्या वेळापत्रानुसार, नियामक मंडळाने विहित केल्याप्रमाणे सांविधिक तरलता निधीचे प्रमाण राखण्यासाठी पात्र संस्थेला स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीतून रक्कम मंजूर करणे आणि आहरण करणे व प्रदान करणे बाबतचे आदेश काढणे ;

(ब) हिशेबपूर्तीस प्रारंभ झाल्याच्या दिनांकानंतर परिसमापनात घेण्यात आलेल्या बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या सदस्यांच्या ठेवींचे प्रदान करण्यासाठी स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीतून रक्कम मंजूर करणे आणि आहरण करणे बाबतचे आदेश काढणे ;

(क) परिसमापकांच्या ठेवीची परतफेड करण्यासाठी सहाय्य किंवा मदत उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक आहेत असे विनियम तयार करणे. नियामक मंडळ हे राज्य शासनाने **राजपत्रात**, वेळोवेळी अधिसूचित केलेल्या रकमेस अधीन राहून मदतीचे प्रमाण किंवा यथास्थिती, सहाय्याची रक्कम ठरविण्यास सक्षम असेल.

(५) नियामक मंडळ, संस्थेकडून आणि किंवा, यथास्थिति, संस्थेच्या परिसमापकाकडून अशा पद्धतीने देण्यात आलेल्या रकमांच्या वसुलीवर संनियंत्रण करील.

१४४-२९अ. जर बिगर कृषि सहकारी पत संस्थेने स्थिरीकरण आणि तरलता सहाय्य निधीमध्ये अंशदान करण्यात कसूर केली असेल किंवा संस्थेने तरलता सहाय्यासाठी उपयोग करून घेतलेल्या रकमेची परतफेड करण्यात कसूर केली असेल किंवा उक्त निधीच्या ठेवीदाराच्या हिशेबपूर्तीसाठी उपयोग करून घेतलेल्या वित्तीय सहाय्याची परतफेड करण्यात कसूर केली असेल तर, निबंधक, जमीन महसुलाची थकबाकी प्रमाणे अंशदान, तरलता सहाय्य किंवा, यथास्थिती, हिशेबपूर्ती, इत्यादीच्या रकमेची थकबाकी वसूल करण्यासाठी, आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर वसुली प्रमाणपत्र देईल, आणि अशी देय असलेली रक्कम आणि व्याज हे संस्था किंवा, यथास्थिती, परिसमापक यांच्या इतर दायित्त्वांच्या संदर्भात प्राथम्य क्रमावर असेल. अंशदान तरलता किंवा वित्तीय सहाय्य, यांच्या थकबाकीची वसुली.

१४४-३०अ. नियामक मंडळाचा सचिव, नियामक मंडळाने विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे अशा नमुन्यात व अशा रीतीने स्थिरीकरण आणि तरलता सहाय्य निधीचे लेखे ठेवील, उक्त निधीसाठी ठेवण्यात आलेल्या लेख्यांचे लेखापरीक्षण नियामक मंडळाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाद्वारे करण्यात येईल. निधीचे लेखे आणि लेखापरीक्षण.

१४४-३१अ. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, यथास्थिती कलम १४४-५अ, कलम १४४-९अ, कलम १४४-१०अ किंवा, यथास्थिति, कलम १४४-२४अ मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरुपाचे उल्लंघन किंवा कसूर, बिगर कृषि सहकारी पत संस्थेकडून झाले असल्यास, निबंधकास अशा बिगर कृषि सहकारी पत संस्थेवर, पुढीलप्रमाणे शास्ती लादता येईल :— शास्ती लादण्याचा निबंधकाचा अधिकार.

(अ) जेथे कलम १४४-५अ किंवा कलम १४४-२४अ मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचे उल्लंघन झाले असेल तेथे, असे उल्लंघन ज्या ठेवींच्या रकमेच्या संबंधात करण्यात आले असेल अशा रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल इतकी शास्ती ;

(ब) जेथे कलम १४४-९अ च्या पोट-कलम (१) किंवा १४४-१०अ मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचे उल्लंघन किंवा कसूर झाली असेल तेथे, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी किंवा जेथे अशी

रक्कम मोजण्याजोगी असेल अशा ठिकाणी असे उल्लंघन किंवा कसूर ज्या ठेवीच्या रकमेसंबंधात झाले असेल त्या रकमेच्या दुप्पट इतकी, यांपैकी जी अधिक असेल इतकी शास्ती ; आणि जर असे उल्लंघन किंवा कसूर करण्याचे चालू राहिले असेल तर असे उल्लंघन किंवा कसूर चालू राहिल्याच्या कालावधीत पहिले उल्लंघन किंवा कसूर केल्यानंतर प्रत्येक दिवसांकरिता पंचवीस हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी अतिरिक्त शास्ती.

(२) पोट-कलम (१) अंतर्गत शास्ती न्यायनिर्णीत करण्यासाठी, निबंधक, बिगर कृषि सहकारी पत संस्थेला नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली रक्कम का लादण्यात येऊ नये याबाबत कारण देण्यास भाग पाडणारी नोटीस बजावील आणि अशा बिगर कृषि सहकारी पत संस्थेला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देखील देईल.

(३) या कलमान्वये निबंधकाद्वारे लादण्यात आलेली कोणतीही शास्ती, बिगर कृषि सहकारी पत संस्थेस रकमेचे प्रदान करण्याची मागणी करणारी निबंधकाद्वारे बजावण्यात आलेली नोटीस ज्या दिनांकास निर्गमित झाली असेल त्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या कालावधीत देय असेल आणि अशा कालावधीत बिगर कृषि सहकारी पत संस्थेने ही रक्कम प्रदान करण्यात कसूर केल्यास, दंडाधिकाऱ्याद्वारे लादण्यात आलेला दंड वसूल करण्यासाठी असा दंड जणूकाही स्वतः दंडाधिकाऱ्याने लादलेला आहे असे समजून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये तरतूद केलेल्या पद्धतीने वसूल करण्यात येईल असा दंड, वसुली झाल्यानंतर स्थिरीकरण आणि तरलता सहाय्य निधीत जमा करण्यात येईल. ” . १९७४ चा २.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १४६ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १४६ मध्ये खंड (प) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

“ (प १) उपरोक्त गोष्टीव्यतिरिक्त, बिगर कृषि सहकारी पत संस्थेच्या बाबतीत,—

(एक) संस्थेने, कलम ४३ किंवा ४४ चे उल्लंघन करणे ; किंवा

(दोन) संस्थेने कलम १४४-४अ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यवसायांव्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वरूपाचे, व्यवसाय करणे ; किंवा

(तीन) संस्थेने, कलम १४४-६अ च्या तरतुदींनुसार मनाई केलेले असे कोणतेही कामकाज करणे ; किंवा

(चार) संस्थेने, कलम १४४-७अ मध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीत संस्थेसाठी आवश्यक नसलेली मालमत्ता निकालात न काढणे ; किंवा

(पाच) संस्थेने, कलम १४४-८अ नुसार अधिसूचित केल्याप्रमाणे प्रशासकीय खर्चाची आणि आस्थापना खर्चाची मर्यादा अतिक्रमित करणे ; किंवा

(सहा) संस्थेने, कलम १४४-११अ आणि कलम १४४-१२अ च्या तरतुदींविरुद्ध काम करणे ; किंवा

(सात) संस्थेने, कलम १४४-२२अ खाली दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे आणि तयार केलेल्या विनियमाचे अनुपालन करण्यात कसूर करणे ; किंवा

(आठ) संस्थेने, कलम १४४-२६अ च्या तरतुदींनुसार स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीत अंशदान करण्यात कसूर करणे ; किंवा ”.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १४७ मध्ये, खंड (प) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १४७ ची सुधारणा.

" (प १) त्या कलमाच्या खंड (प १) खालील अपराध असल्यास, पंचवीस हजार रुपययांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा किंवा तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल, किंवा या दोन्हीं शिक्षा होतील ; ".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.